# निसर्गशाळापुस्तक-प्रस्तावना

**प्रस्तावना**

आपल्या आजवरच्या शिक्षणात पर्यावरणशास्त्राला आणि पर्यावरणसंबंधित व्यवहाराला फारसे स्थान नाही. उच्च शिक्षणात तर ते नाहीच; पण शालेय शिक्षणात, त्याला काही स्थान असावे, अशी चर्चा तरी अधून मधून होत असते. कार्यानुभव सारख्या विषयांतून - म्हणजे दुय्यम तिय्यम विषयातून - पर्यावरणाला स्पर्श करावा असाही काहीसा प्रयत्न होतो; पण तोही त्रोटकच. अलीकडे शालेय स्तरावर 'पर्यावरण' हा एक स्वतंत्र विषय ठेवावा, अशीही मागणी होताना दिसते. मला हा सगळाच प्रकार अडाणी आणि निरुपयोगी वाटतो. शाळेत 'विषय' म्हणून एखाद्या ज्ञानक्षेत्राचा प्रवेश झाला आणि पुढे त्याची परीक्षा ठेवण्यात आली तर मुलांना विषय आत्मसात न होताही उत्तीर्ण होता येते आणि मग नव्या विषयाची ओळख करून देण्याचा मूळ हेतूच लयाला जातो. शालेय पातळीवर पहिली पासून इंग्रजी सुरू करून काय झाले - नव्हे काही कसे नाही झाले - याचा अनुभव आपण घेतच आहोत. त्यामुळे ‘पर्यावरणशास्त्र' असा एखादा विषय शालेय पातळीवर आणण्याचा प्रयत्न करूच नये असे माझे मत आहे.

पर्यावरण हा शालेय शिक्षणाचा नव्हे तर तो मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पर्यावरणाचे स्वरूप, त्याचे शास्त्र, त्याचे रक्षण, त्याचे संवर्धन, त्याचा आत्मा, त्याचे सौंदर्य या सा-या गोष्टी, अनुभवण्याच्या आणि अंगात भिनवून घेण्याच्या गोष्टी आहेत. पर्यावरणाचे समृद्ध असणे आणि आपले समृद्ध जगणे या एकसंघ गोष्टी आहेत याची जाण प्रत्येकाला जन्मल्यापासून येत राहणे आणि पर्यावरणीय जगण्याची सवय असणे या गोष्टी समाजात निर्माण कशा होतील ही खरे तर आपली चिंता आहे.

पर्यावरणाच्या अंगाने विचार करता, शालेय शिक्षणापेक्षा शालेय शिक्षणाचे वय महत्त्वाचे आहे. साधारणपणे वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षांपर्यंत, पर्यावरणीय जगण्याचे सातत्याने व प्रभावी अनुभव मुलांनी घेतले तर त्यांचे सारे जीवन पर्यावरणावगुंठित होऊ शकते. हेच नेमके आपल्याला घडायला हवे आहे. केतकी घाटे व मानसी करंदीकर, दोघीही पर्यावरणीय जीवन स्वतः जगत आहेत, त्यामुळे या दिशेने, आपापल्या जीवनाला, मुलांनी कशा तहेने वळण लावावे हे सांगण्याचा त्यांना 'निसर्गदत्त' अधिकार आहे. त्यांनी निसर्ग नुसता पाहिलेला नाही तर तो अनुभवला आहे. नुसते निसर्गाचे आकलन करून घेतले नाही तर तो आपल्या रंध्रारंध्रांतून मुरविला आहे. त्यांची भाषा,त्यांचे विचार आणि त्यांचे आचार पर्यावरणाधीन झाले आहेत याचा प्रत्यय, प्रस्तुतच्या तीन पुस्तिकांच्या स्वरूपावरून आणि त्यांच्यातील उपक्रमांच्या विविधतेतून लक्षात येईल.

या पुस्तिकांमधून मुख्यतः दोन प्रकारचे उपक्रम आढळतील. एक, आपापल्या वर्गात करायचे आणि दोन, वर्गाबाहेर आजुबाजूच्या परिसरात करायचे उपक्रम. यांतही सुयोग्य अशी क्रमवारी आहे. हे सर्वच उपक्रम, त्यांत भाग घेताना, मुलांना आवडतील, त्यांना मजा वाटेल अशा प्रकारचे आहेत. ही मजा टिकवावी म्हणून, सर्वच उपक्रमांत, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या गप्पांना प्राधान्य दिले आहे. येथे शिकवणे नाही तर विद्यार्थ्यांचे शिकणे आहे; आणि तेही विद्यार्थ्यांना अगोदरच असलेल्या माहितीच्या आधारे नवीन माहिती मिळविणारे असे आहे.

कित्येक उपक्रमांना मुलांसाठी जोड उपक्रमही दिले आहेत. उदा. चित्रे काढणे, लिहिणे, काहीतरी तयार करणे इत्यादी. निरीक्षण करणे तर सर्वच उपक्रमांतील महत्त्वाचा भाग आहे. काही ठिकाणी तर मुलांना छोटे छोटे प्रयोगही करायला दिले आहेत. शिवाय कविता, गोष्टी, संवाद, नाटिका आहेतच. ब-याचा वेळा, मुले छोट्या गटांत, एकमेकांसमवेत काम करणार आहेत. बाहेर जाऊन मोठ्यांच्या मुलाखतीही घेणार आहेत. अशा एक ना अनेक प्रकारे मुले, विविधांगी अनुभव, स्वतःच घेणार आहेत. यालाच, ज्ञानप्राप्तीचा रचनावादी मार्ग असे म्हणतात.

एक, मुलांच्या नैसर्गिक आकलन प्रक्रियेला साजेसे रचनात्मक उपक्रम, दोन, वयानुसार अनुभवांची उपलब्धता, तीन, पर्यावरणाचे विविधांगी आकलन होऊ शकेल असा विषयाचा आवाका आणि चार, शालेय वेळापत्रकाच्या मर्यादेतही बसू शकेल असा एकूण वार्षिक कार्यक्रम ही या तीन पुस्तकी संचाची खास वैशिष्ट्ये आहेत.

इतकी विचारपूर्वक, श्रमपूर्वक केलेली पर्यावरणशास्त्राची व्यावहारिक मांडणी, दुसरी कोणतीही माझ्या पाहण्यात नाही.

शाळांनी, मुलांसाठी काम करणा-या अन्य स्वेच्छासंस्थांनी ह्या पुस्तिकांचा वापर करून मुलांचे जीवन निसर्ग जीवनाशी जोडण्याची किमया करून दाखवावी; भावी पिढीचे जीवन निसर्गसमृद्ध होण्यासाठी मुलांची मानसिकता घडविण्याची जबाबदारी घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

❖